**सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०.०००१२२०-२००६**

**<u>निशानी क्र.८२ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या संदर्भात पुर्तता करण्याबाबत झालेला ११ वर्ष १० महिने १८ दिवसाचा विलंब माफ होउन मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादी हे प्रतिवादी क्र. ३ हे मयत झालेनंतर त्यांच्याविरूध्द दाव्यात पुर्तता करणेसंदर्भात कोणतीही आवश्यक स्टेप घेउ शकले नाहीत. वादी यांना प्रतिवादी क्र. ३ हे मयत झालेनंतर माहीती नसल्याने आणि पुर्वीच्या विधीज्ञांनी misguide केल्याने वादी हे वेळेच्या पूर्वी मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या विरूध्द कोणतीही पुर्तता करू शकले नाहीत. वादी यांनी सदरचा अर्ज हा आता दाखल केला असून वादी मुद्दाम्न कोणताही उशीर केला नाही. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या संदर्भात पुर्तता करण्यासंदर्भात झालेल्या उशिराबाबतचे कारण हे संयुक्तिक आहे. दाव्याच्या गुणदोषावर निकाल करण्याकरीता वादी यांचा मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या विरूध्द पुर्तता करण्याबाबत झालेला ११ वर्षे १० महिने १८ दिवस इतका उशीर माफ होउन मिळणे हे महत्वाचे आहे. जर वादी यांचा हा अर्ज नामंजूर झालेस त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांचा अर्ज हा मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी आपले म्हणणे दाखल केले व कथन केले आहे की, सदर प्रकरणातील प्रतिवादी नं. ३ ही दि. १०.११.२००८ रोजी मयत झाली आहे. वादी ही प्रतिवादी नं. ३ ची मुलगी असून ती प्रतिवादी नं. ३ चे अंत्यविधीला हजर होती असे असताना तिने मुदतीत मयताचे वारस रेकॉर्डवर घेणे जाणूनबूजूण टाळले आहे. त्यामुळे कोर्टाने वादीचा दावा अबेट केला जो योग्य आहे. करीता वादीचा अर्ज खारीज करण्याची कृपा करावी नसता वादीस १०,०००/- रू. कॉस्ट करण्यात यावी.

४. प्रतिवादी क्र. ५ यांना प्रस्तुत अर्जाकामी आपले म्हणणे पुरेशी संधी देवूनही दाखल केले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ यांच्या विरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत झाला.

५. वादी यांनी प्रस्तुत अर्जास मयत प्रतिवादी क्र. ३ द्वारकाबाई यांचे मृत्यूप्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

६. प्रस्तुत अर्ज व म्हणणे अवालोकीले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र.३ द्वारकाबाई हे मयत झाल्याने त्यांच्या संदर्भात पुर्तता करणेकामी झालेला ११ वर्ष १० महिने १८ दिवसाचा विलंब माफ होणेबाबत दाखल केला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की प्रतिवादी क्र. ३ हे मयत झालेनंतर त्यांना माहीती नसल्याने व पूर्वीच्या विधीज्ञांनी वादी यांना केलेल्या misguide मुळे वादी हे वेळेमध्ये मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्याबाबत दाव्यात कोणतीही पुर्तता करू शकले नाहीत. दावा हा गुणदोषावर निकाल लागणेकरीता मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या बाबत पुर्तता होणेबाबत झालेला ११ वर्ष १० महिने १८ दिवसाचा विलंब माफ होणे गरजेचे आहे. त्यामुळे तो विलंब माफ होउन सदर अर्ज हा मंजूर करण्यात यावा.

७. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी आपल्या दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ हे दि. १०.११.२००८ रोजी मयत झाले असून वादी ही प्रतिवादी क्र. ३ यांची मुलगी असून वादीनी जाणूनबूजून माहीती असताना देखील सुध्दा मुदतीमध्ये मयताचे वारस हे रेकॉर्डवर घेणे हे जाणूनबुजून टाळले आहे. त्यामुळे दाव्यामध्ये झालेला आदेश हा योग्य आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा नसता वादीस १०,००० रू. कॉस्ट करावी असे कथन केले आहे.

८. वादी व प्रतिवादी यांच्या अर्जातील व म्हणण्यातील कथनांचे अवलोकन केले असता तसेच मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवालेकन केले असता प्रतिवादी क्र. ३ द्वारकाबाई ही दि. १०.११.२००८ रोजी मयत असल्याचे दिसून येते. वादी यांनी जवळपास मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरूध्द ११ वर्ष १० महिने १८ दिवसानंतर दाव्यामध्ये पुर्तता केली नसून वादी यांनी आता हा अर्ज दाखल केला आहे. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ३ बाबत दाव्यामध्ये पुर्तता करणेबाबत ११ वर्ष १० महिने १८ दिवस विलंब झालेला दिसून येतो. प्रस्तुत अर्जातील नमूद कारण हे योग्य स्वरूपातील दिसून येत नाही. परंतु या ठिकाणी दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्याकरीता वादी यांना नैसर्गिक न्यायदानाच्या तत्वानुसार एक पुरेशी संधी देणे हे महत्वाचे

आहे. त्यामुळे वादी यांचा विलंब माफ होउन मिळणेकरीता एक पुरेशी संधी देणे हे आवश्यक आहे. वादी यांचा अर्ज नामंजूर झालेस वादी यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट सदर अर्ज मंजूर केला असता प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

९. एकूणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता तसेच वरील सर्व कारणांचा विचार केला असता वादी यांचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. याकरीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रू. २००/-(दोनशे रू. फक्त) ईतकी कॉस्ट देणेचे अटीवर मंजूर करणेत येतो.

दिनांक १४/०९/२०२१

(एस.व्ही.जंगमस्वामी )
२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

Dictated on : 14.09.2021

Transcribed on : 14.09.2021

Checked & signed on : 14.09.2021

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.